Vol-13 Special Issue- 1.3 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# विकसित भारत @ २०४७ च्या दृष्टीने उच्च शिक्षणासमोरील आव्हाने व भूमिका

**डॉ. शेखराम परसराम येळेकर**
सहयोगी प्राध्यापक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे बॅरि. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय नागपूर

## प्रस्तावना

भारताचा इतिहास गौरवशाली आहे. सन १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होतील. या ऐतिहासिक टप्प्याच्या पार्श्वभूमीवर "विकसित भारत @ २०४७" ही संकल्पना मांडण्यात आली आहे. या संकल्पनेचा उद्देश भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम, सामाजिकदृष्ट्या समतावादी, तंत्रज्ञानात प्रगत आणि जागतिक पातळीवर नेतृत्व करणारा राष्ट्र बनवणे हा आहे. विकसित भारत ही केवळ स्वप्नपूर्ती नसून प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून साकार होणारी राष्ट्रीय जबाबदारी आहे. विकसित भारत म्हणजे केवळ उच्च उत्पन्न असलेला देश नव्हे, तर जिथे प्रत्येक नागरिकाला शिक्षण, आरोग्य, रोजगार, सुरक्षितता आणि सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध असेल असा देश होय. आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण, सुशासन आणि नैतिक मूल्ये यांचा समतोल साधणे हे विकसित भारताचे मुख्य वैशिष्ट्य असेल. विकसित भारत @ २०४७ हे फक्त भौतिकदृष्ट्या प्रगत राष्ट्र नसून ज्ञान, विज्ञान, नवोन्मेष, मानवतेचे मूल्य आणि सामाजिक जबाबदारी यांचा संगम असलेले राष्ट्र आहे. अशा राष्ट्रासाठी उच्चशिक्षण ही पायाभूत गरज आहे. जेव्हा प्रत्येक नागरिक सक्षम, सृजनशील, नैतिक आणि जागतिक दृष्टिकोनाचा असेल, तेव्हाच भारत एक सशक्त, समृद्ध आणि विकसित राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहू शकेल. उच्च शिक्षण हे विकसित भारताचे मजबूत पायाभूत स्तंभ आहे. आज असलेली आव्हाने मोठी असली तरी योग्य धोरणे, प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाच्या सर्व घटकांचा सहभाग यांमुळे ही आव्हाने संधींमध्ये रूपांतरित होऊ शकतात. गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक आणि भविष्याभिमुख उच्च शिक्षण प्रणाली निर्माण केली, तर भारत निश्चितच विकसित राष्ट्र म्हणून जागतिक पातळीवर आपले स्थान निर्माण करेल. सक्षम, कुशल आणि नवोन्मेषी तरुण पिढी घडवली, तर विकसित भारताचे स्वप्न नक्कीच साकार होईल.

## विकसित भारत @ २०४७ चे प्रमुख उदिष्ट्ये :-

भारताला आत्मनिर्भर बनवणे.

नवीन शिक्षण धोरणामुळे संशोधन, नवोन्मेष, विज्ञान-तंत्रज्ञान आणि सर्जनशीलतेला चालना मिळेल. युवकांना आधुनिक कौशल्ये देऊन त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनवणे.

महिला, बालक, वृद्ध आणि दिव्यांग यांच्या कल्याणासाठी प्रभावी धोरणे राबवणे.

कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळ संशोधन, हरित ऊर्जा, जैवतंत्रज्ञान आणि डिजिटल सेवा यांमध्ये भारताने आघाडी घेणे अपेक्षित आहे. डिजिटल व्यवहार, ई-शासन आणि स्मार्ट पायाभूत सुविधा यांमुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविणे.

विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे.

लोकशाहीत नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असतो. जबाबदार नागरिक, कर्तव्यनिष्ठ अधिकारी आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व यांच्या माध्यमातूनच विकसित करणे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## उच्चशिक्षणाचे महत्त्व :

### उच्चशिक्षणाचे महत्त्व पुढीलप्रमाणे :-

उच्चशिक्षणामुळे देश जागतिक स्पर्धेत टिकून राहतो. उच्चशिक्षण माणसाच्या बुद्धी, सृजनशीलता, तार्किक विचारशक्ती आणि सामाजिक जबाबदारीला आकार देते. विकसित भारतासाठी नागरिकांचे सखोल ज्ञान, कौशल्ये आणि जागतिक दृष्टीकोन आवश्यक आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, कला, सामाजिक विज्ञान, अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांत उच्चशिक्षणामुळेच देश जागतिक स्पर्धेत टिकून राहू शकतो.

उच्चशिक्षणामुळे रोजगारनिर्मिती होते. उच्चशिक्षणाने योग्य कौशल्य विकसित केल्यास उद्योग, व्यवसाय, संशोधन आणि स्टार्टअप्समध्ये नवे उपक्रम सुरू करता येतात. त्यामुळे रोजगारनिर्मिती होते, नवोन्मेषाला चालना मिळते आणि देश आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर बनतो. विकसित भारत @ २०४७ या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

उच्चशिक्षणामुळे संशोधनाला गती व दिशा मिळते. उच्चशिक्षण संशोधनाच्या माध्यमातून देशाला जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान, औषधे, हरित ऊर्जा, अंतराळ संशोधन, जैवतंत्रज्ञान, आणि डिजिटल सेवा यामध्ये आघाडी मिळवून देते. विकसित भारतासाठी नवोन्मेष आणि संशोधन यांवर भर देणे आवश्यक आहे. फक्त उच्च शिक्षण नव्हे, तर ज्ञानाच्या आधारावर नवसंकल्पना आणि नवीन प्रयोग करण्याची क्षमता देखील तयार करणे गरजेचे आहे. एकंदरीत उच्चशिक्षणामुळे संशोधनाला गती व दिशा मिळते.

उच्चशिक्षणाने नैतिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी, आणि नेतृत्व गुण यांचा विकास होतो. उच्चशिक्षणाने नैतिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी, सहिष्णुता, परोपकार आणि नेतृत्व गुण यांचाही विकास होतो. विकसित भारत म्हणजे सामाजिक न्याय, समता, स्वच्छता आणि पर्यावरणपूरक जीवनशैली असलेला राष्ट्र. उच्चशिक्षण हे नागरिकांना आपल्या अधिकारांबरोबर जबाबदाऱ्या समजून घेण्यास सक्षम करते.

उच्चशिक्षणामुळे महिलांना उच्चशिक्षणाची संधी मिळते. २०४७ पर्यंत विकसित भारतात सर्व स्तरातील महिलांना उच्चशिक्षणाची संधी असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महिलांचे शिक्षण वाढल्यास कुटुंब, समाज आणि अर्थव्यवस्था सर्व क्षेत्रांत प्रगती होते.

उच्चशिक्षणामुळे कौशल्याधारित ज्ञान उपलब्ध होते. उच्चशिक्षणात डिजिटल शिक्षण महत्त्वाचे आहे. डिजिटल शिक्षणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि युवक यांना तांत्रिक व कौशल्याधारित ज्ञान सहज उपलब्ध होईल, ज्यामुळे संपूर्ण देशाच्या प्रगतीला गती मिळेल.

## विकसित भारत@२०४७ च्या दृष्टीने उच्च शिक्षणासमोरील आव्हाने :-

भारतात उच्च शिक्षणाचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला असला, तरीही विकसित भारताच्या उद्दिष्टपूर्तीसाठी या क्षेत्रात अनेक गंभीर आव्हाने आजही कायम आहेत. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न साकार करायचे असेल, तर उच्च शिक्षण व्यवस्था सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक असणे अत्यंत आवश्यक आहे. विकसित भारत@२०४७ च्या दृष्टीने उच्च शिक्षणासमोरील आव्हाने पुढीलप्रमाणे

आजच्या काळात उद्योगांना कौशल्याधारित मनुष्यबळाची गरज आहे. मात्र अनेक अभ्यासक्रम कालबाह्य असून उद्योगांच्या गरजांशी सुसंगत नाहीत. यामुळे पदवीधर बेरोजगारी वाढते. स्किल-बेस्ड एज्युकेशन आणि इंडस्ट्री-अकॅडेमिया लिंक मजबूत करणे आवश्यक आहे.

डिजिटल इंडिया उपक्रमामुळे ऑनलाइन शिक्षणाला चालना मिळाली असली, तरी सर्व विद्यार्थ्यांना इंटरनेट, संगणक आणि डिजिटल साधनांची समान उपलब्धता नाही. विशेषतः ग्रामीण भागात ही समस्या तीव्र आहे. डिजिटल दरी भरून न काढल्यास उच्च शिक्षण सर्वसमावेशक होऊ शकणार नाही.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

विकसित देशांची ओळख ही त्यांच्या संशोधन, नवकल्पना आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे होते. भारतात संशोधनावर होणारा खर्च मर्यादित आहे. विद्यापीठे, उद्योग आणि संशोधन संस्था यांच्यात आवश्यक तेवढा समन्वय नाही. त्यामुळे पेटंट्स, स्टार्ट-अप्स आणि जागतिक दर्जाचे संशोधन अपेक्षित प्रमाणात होत नाही.

उच्च शिक्षण संस्थांची संख्या वाढली असली तरी शिक्षणाची गुणवत्ता सर्वत्र समान नाही. अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये अद्ययावत अभ्यासक्रम, संशोधनाभिमुख शिक्षण आणि व्यावहारिक प्रशिक्षणाचा अभाव दिसून येतो. विद्यार्थ्यांना केवळ पदवी मिळते; परंतु रोजगारक्षम कौशल्ये मिळत नाहीत. हे विकसित भारताच्या दृष्टीने मोठे आव्हान आहे.

उच्च शिक्षणातील गुणवत्तेचा कणा म्हणजे शिक्षक. परंतु अनेक संस्थांमध्ये प्रशिक्षित आणि प्रेरित शिक्षकांची कमतरता आहे. काही ठिकाणी रिक्त पदे भरली जात नाहीत, तर काही ठिकाणी शिक्षकांना आधुनिक अध्यापन पद्धती व तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळत नाही. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होतो.

उच्च शिक्षण क्षेत्रात कधीकधी जास्त प्रमाणात नियम, संथ प्रशासकीय प्रक्रिया आणि स्वायत्ततेचा अभाव दिसून येतो. यामुळे नवकल्पना, अभ्यासक्रम बदल आणि संशोधन प्रकल्प राबवणे कठीण जाते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ही सकारात्मक पायरी असली, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी हे मोठे आव्हान आहे.

शहरी आणि ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाच्या संधींमध्ये मोठी दरी आहे. ग्रामीण, आदिवासी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण मिळण्यात अडचणी येतात. भाषा, आर्थिक परिस्थिती, डिजिटल सुविधा आणि मार्गदर्शनाचा अभाव ही असमानतेची प्रमुख कारणे आहेत.

जागतिक विद्यापीठ क्रमवारीत भारतीय विद्यापीठांचे स्थान अजूनही अपेक्षेपेक्षा खाली आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आकर्षित करण्यात, परदेशी विद्यापीठांशी सहकार्य करण्यात आणि जागतिक दर्जाचे संशोधन करण्यात मर्यादा आहेत. विकसित भारतासाठी जागतिक पातळीवर स्पर्धात्मक उच्च शिक्षण व्यवस्था आवश्यक आहे.

## विकसित भारत@२०४७ च्या वाटचालीसाठी उच्च शिक्षणाची भूमिका :-

विकसित भारत@२०४७ च्या वाटचालीसाठी उच्च शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केंद्रस्थानी ठेवून देशाची वाटचाल सुरू आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक प्रगती आवश्यक आहे. या सर्व प्रक्रियेत सक्षम, कुशल आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

**संशोधन, नवोपक्रम आणि तंत्रज्ञान विकास :-** विकसित राष्ट्रांची ओळख ही त्यांच्या संशोधन व नवोपक्रम क्षमतेवर आधारित असते. उच्च शिक्षण संस्था या संशोधनाचे केंद्र असतात. विद्यापीठांमधील प्रयोगशाळा, संशोधन केंद्रे, इनक्युबेशन हब्स आणि नवोन्मेष मंच यांच्या माध्यमातून नवे तंत्रज्ञान विकसित होते. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, रोबोटिक्स, नॅनोतंत्रज्ञान, आरोग्य विज्ञान आणि कृषी तंत्रज्ञान या क्षेत्रांत भारताला जागतिक नेतृत्व मिळवून देण्याची क्षमता उच्च शिक्षणात आहे.

**लोकशाही मूल्ये आणि जबाबदार नागरिक घडवणे :-** उच्च शिक्षण हे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करते. संविधान, मानवी हक्क, सामाजिक न्याय, नैतिकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांची समज उच्च शिक्षणातून विकसित होते. चिकित्सक विचार करणारे, प्रश्न विचारणारे आणि समाजासाठी जबाबदारी स्वीकारणारे नागरिक घडवणे हे उच्च शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. अशा सुजाण नागरिकांवरच मजबूत लोकशाही आणि विकसित राष्ट्र उभे राहते.

**कौशल्याधारित रोजगारनिर्मिती :-** उद्योगांच्या गरजांनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास उत्पादनक्षमता वाढते. उच्च शिक्षणामुळे ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेचा पाया घातला जातो. आयटी, जैवतंत्रज्ञान, फार्मास्युटिकल्स, अंतराळ संशोधन, अक्षय ऊर्जा, उत्पादन उद्योग आणि सेवा क्षेत्रात उच्च शिक्षणातून प्रशिक्षित मनुष्यबळ कार्यरत असते. यामुळे

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

उत्पादनक्षमता वाढते, निर्यात वाढते आणि रोजगारनिर्मिती होते. उद्योजकता आणि स्टार्ट-अप संस्कृतीला उच्च शिक्षणातून चालना मिळते, ज्यामुळे तरुण स्वतः रोजगारनिर्माते बनतात. नव्या उद्योगांची निर्मिती यामध्ये उच्च शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते.

**मनुष्यबळ विकासात उच्च शिक्षणाचे योगदान :-** विकसित भारतासाठी केवळ शिक्षित नव्हे, तर कौशल्यसंपन्न आणि नवोन्मेषी मनुष्यबळ आवश्यक आहे. कोणत्याही देशाच्या प्रगतीचा मुख्य आधार म्हणजे त्याचे मनुष्यबळ. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून देशाला कुशल, प्रशिक्षित आणि विचारक्षम मनुष्यबळ प्राप्त होते. अभियांत्रिकी, वैद्यकीय, विज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन, शिक्षण, कायदा आणि सामाजिक शास्त्रे अशा विविध क्षेत्रांत तज्ज्ञ घडवण्याचे कार्य उच्च शिक्षण करते. देशाच्या प्रगतीला चालना देऊन विकसित भारतासाठी गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

**सामाजिक समता आणि सर्वसमावेशक विकास :-** उच्च शिक्षण समाजातील दुर्बल घटकांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणते. आरक्षण धोरण, शिष्यवृत्ती, शिक्षण कर्ज, मुक्त व दूरस्थ शिक्षण आणि डिजिटल शिक्षणामुळे ग्रामीण, आदिवासी, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना संधी मिळतात. शिक्षणामुळे सामाजिक विषमता कमी होऊन समताधिष्ठित समाजनिर्मिती होते.

**आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची ओळख निर्माण करणे. :-** जागतिकीकरणाच्या युगात उच्च शिक्षण आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची ओळख निर्माण करते. दर्जेदार विद्यापीठे, आंतरराष्ट्रीय सहकार्य, विद्यार्थी व शिक्षकांची देवाणघेवाण, संयुक्त संशोधन प्रकल्प यांमुळे भारत ज्ञानकेंद्र म्हणून पुढे येऊ शकतो. विदेशी विद्यार्थी भारतात शिक्षणासाठी येऊ लागल्यास सांस्कृतिक आदान-प्रदान वाढेल आणि भारताची सौम्य शक्ती (Soft Power) अधिक मजबूत होईल. जागतिक विद्यापीठ क्रमवारीत भारतीय संस्थांचे स्थान उंचावणे हे विकसित भारताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय :-** भारतीय संस्कृती महान आहे. उच्च शिक्षण भारतीय संस्कृती, भाषा आणि परंपरांचे जतन करण्यासोबत आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाशी त्यांचा समन्वय साधते. योग, आयुर्वेद, भारतीय तत्त्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र आणि भाषाशास्त्र या क्षेत्रांतील भारतीय ज्ञानपरंपरेचा शास्त्रीय अभ्यास उच्च शिक्षणातूनच शक्य आहे. परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल साधून राष्ट्रनिर्मिती करणे ही विकसित भारताची खास ओळख ठरू शकते.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि भविष्यातील दिशा :-** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मुळे उच्च शिक्षणात लवचिकता, बहुविषयक अभ्यासक्रम, कौशल्याधारित शिक्षण आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळाले आहे. याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास उच्च शिक्षण विकसित भारताच्या संकल्पनेला भक्कम आधार देऊ शकते.

**उच्च शिक्षणाच्या माध्यमातून जगाच्या कल्याणासाठी 'वसुधैव कुटुंबकम्' भावनेचा विकास :-** "वसुधैव कुटुंबकम्" या भावनेनुसार संपूर्ण मानवजात, सर्व सजीव आणि निसर्ग एकाच कुटुंबाचे घटक आहेत. येथे देश, धर्म, भाषा, जात किंवा वंश यांसारख्या भेदांना स्थान नाही. सर्वांचे सुख-दुःख एकमेकांशी जोडलेले आहे, ही जाणीव या संकल्पनेत अंतर्भूत आहे. ही व्यापक दृष्टीच जगाच्या कल्याणाचा पाया ठरते. जगाचे खरे कल्याण केवळ भौतिक प्रगतीत नाही, तर मानवतेचा विकास, शांतता, समता आणि शाश्वत जीवनपद्धती यांत दडलेले आहे. आजच्या काळात स्वार्थ, स्पर्धा, हिंसा आणि असमानता यांमुळे मानवजातीसमोर अनेक संकटे उभी आहेत. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृतीतील महान विचारधारा "वसुधैव कुटुंबकम्" जगाच्या कल्याणासाठी मार्गदर्शक ठरते. संपूर्ण पृथ्वी हे एकच कुटुंब आहे ही भावना सार्वत्रिक कल्याणाची जाणीव करून देते. जेव्हा सर्व राष्ट्रे एकमेकांकडे कुटुंबातील सदस्य म्हणून पाहतात, तेव्हा संघर्षाऐवजी सहकार्याचा मार्ग स्वीकारला जातो. जगाचे कल्याण हे कोणत्याही एका देशापुरते किंवा समाजापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण मानवजातीशी

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

संबंधित आहे. स्वार्थ, अहंकार आणि द्वेष यांवर मात करून प्रेम, करुणा आणि सहअस्तित्वाचा स्वीकार केल्यासच खरे जागतिक कल्याण साध्य होईल. "वसुधैव कुटुंबकम्" ही भावना जगाच्या कल्याणासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ असून, ती आत्मसात केल्यास एक शांत, समतोल आणि सुसंस्कृत जग निर्माण होऊ शकते. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून जगाच्या कल्याणासाठी 'वसुधैव कुटुंबकम्' भावनेचा विकास करणे महत्त्वाचे आहे.

**सारांश :-** "विकसित भारत @ २०४७ व उच्चशिक्षणापुढील आव्हाने व भूमिका या संदर्भात महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक आणि भविष्याभिमुख उच्च शिक्षण प्रणाली निर्माण केली, तर भारत निश्चितच विकसित राष्ट्र म्हणून जागतिक पातळीवर आपले स्थान निर्माण करेल.

विकसित भारत @ २०४७ हे फक्त भौतिकदृष्ट्या प्रगत राष्ट्र नसून ज्ञान, विज्ञान, नवोन्मेष, मानवतेचे मूल्य आणि सामाजिक जबाबदारी यांचा संगम असलेले राष्ट्र आहे. अशा राष्ट्रासाठी उच्चशिक्षण ही पायाभूत गरज आहे.

जेव्हा प्रत्येक नागरिक सक्षम, सृजनशील, नैतिक आणि जागतिक दृष्टिकोनाचा असेल, तेव्हाच भारत एक सशक्त, समृद्ध आणि विकसित राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहू शकेल.

गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक आणि नवोपक्रमप्रधान उच्च शिक्षण प्रणाली निर्माण केली, तर भारत निश्चितच विकसित राष्ट्र म्हणून जागतिक पातळीवर आपले स्थान निर्माण करेल.

विकसित भारताच्या घडणीत उच्च शिक्षण ही एक मूलभूत आणि अपरिहार्य शक्ती आहे. सक्षम मनुष्यबळ, मजबूत अर्थव्यवस्था, संशोधन व नवोपक्रम, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये आणि जागतिक नेतृत्व या सर्व घटकांचा केंद्रबिंदू उच्च शिक्षण आहे.

विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी उच्च शिक्षणात गुणवत्ता सुधारणा, संशोधनासाठी निधी वाढवणे, शिक्षक प्रशिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम, डिजिटल पायाभूत सुविधा आणि सर्वसमावेशक धोरणे राबवणे आवश्यक आहे.

उद्योग-शिक्षण सहकार्य, स्टार्ट-अप संस्कृती आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांवर विशेष भर देणे गरजेचे आहे.

"वसुधैव कुटुंबकम्" या भावनेनुसार संपूर्ण मानवजात, सर्व सजीव आणि निसर्ग एकाच कुटुंबाचे घटक आहेत. येथे देश, धर्म, भाषा, जात किंवा वंश यांसारख्या भेदांना स्थान नाही. सर्वांचे सुख-दुःख एकमेकांशी जोडलेले आहे, ही जाणीव या संकल्पनेत अंतर्भूत आहे. ही व्यापक दृष्टीच जगाच्या कल्याणाचा पाया ठरते. अशाप्रकारे २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होतील. या पार्श्वभूमीवर "विकसित भारत @ २०४७" ही संकल्पना मांडण्यात आली आहे. या संकल्पनेचा उद्देश भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम, सामाजिकदृष्ट्या समतावादी, तंत्रज्ञानात प्रगत आणि जागतिक पातळीवर नेतृत्व करणारा राष्ट्र बनवणे हा आहे. उच्च शिक्षण हे विकसित भारत@ २०४७चे पायाभूत स्तंभ आहे. आज असलेली आव्हाने मोठी असली तरी योग्य धोरणे, प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाच्या सर्व घटकांचा सहभाग यांमुळे ही आव्हाने संधींमध्ये रूपांतरित होऊ शकतात. सक्षम, कुशल आणि नवोन्मेषी तरुण पिढी घडवली, तर विकसित भारताचे स्वप्न नक्कीच साकार होईल.

## संदर्भ

घोरमोडे के. यु., (2009), शिक्षकांचे शिक्षण, नागपूरः विद्या प्रकाशन

कुलकर्णी विश्वंभर, भिंताडे विनायक (2006), भारतीय आधुनिक शिक्षण, पुणेः श्री विद्या प्रकाशन

वाघ शैलेशकुमार व सोनवणे सिध्दार्थ (2024), भारतीय ज्ञान प्रणाली, धुळे, अथर्व पब्लिकेशन

सोनजे विजय (2024), प्राचीन भारतीय ज्ञान प्रणाली, जळगाव, कुमुद पब्लिकेशन

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020

https://en.wikipedia.org

https://viksitindia.com/